# आशियाई राजकीय व्यवस्थेतील लोकशाहीसमोरील आव्हाने

स्वाती सदाशिव कुराडे (पाटील),एम. ए. एम. फिल. नेट. सेट (राज्यशास्त्र) नेट (स्त्री अभ्यास)

---

शोधनिबंधसार (Abstract)

नैसर्गिक आपत्ती कोरोनसारखी महामारी, रोगराई, युद्ध, युद्धजन्य परिस्थिती इ. घटना सध्य स्थितीत मानवी जीवनाच्या अविभाज्य भागच झाल्या आहेत. मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिला असता असे लक्षात येते की अशा या घटनांमुळे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थित्यंतरे होतात. अशीच स्थित्यंतरे आशियाच्या राजकीय व्यवस्थेमध्ये देखील घडून येताना दिसत आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधात आशिया खंडातील लोकशाही समोरील समस्यांचा आव्हानांचा आढावा घेतला आहे. सध्या घडत असलेली युर्कैन-रशिया यांच्या युद्धजन्य परिस्थितीची टांगती तलवार आशियावर परिणामकारक ठरत आहे. तर नागरिक महामारीची थैमान अजून काही थांबलेलेच नाही. तसेच आशियामधील अनेक देश असमानता व उच्चभ्रू भ्रष्टाचाराने ग्रासलेले आहेत. काही देश अधिकाधिक श्रीमंत होत चालले आहेत. तरी काही देश गरिबीतच खितपत पडलेले आहेत. याच बरोबर धार्मिक, वांशिक, राजकीय संसचनात्मक धुरवीकरणाचा क्षोभ वाढला आहे. त्यामुळे नागरी समाजाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उभा राहतो. त्याची मूल्यहिनता होताना दिसते. त्यामध्ये अजूनही स्त्रियांना दुय्यमच वागणूक दिली जाते. आशियाई काही राष्ट्रांमध्ये स्त्रियांच्यावर आचार, विचार, राजकीय व्यवस्थेमध्ये सहभागी होण्याव, त्यांच्या राहणीमानापासून त्यांच्या वर अन्याय केला जात असताना दिसतो. अशातच अस्पृश्यता, वर्णव्यवस्था, स्त्रियांबद्दल तृच्छवाद इ. बीज घेऊन फॅसिझम जन्मला येतो. त्याचे आव्हान फार मोठे होऊन जाते. त्याला थोपविण्यासाठी मग अनेक कारवाया केल्या जातात. त्यातच दहशतवादासारखी नवी आव्हाने उभी राहतात. त्याचा बिमोड करणे हे राजकीय व्यवस्थेसमोरील मोठे आव्हान ठरते. त्यांची पाळेमुळे ही खोलवर रुजलेली दिसतात. ती टिकवून ठेवण्यासाठी काळ्या पैशाचा वापर केला जातो. त्यासाठी ठिकठिकाणी केंद्रस्थाने उभारली जातात. त्यामुळे ती नवीनच समस्या होऊन जाते.

शोधनिबंध प्रस्तुत करत असताना शीर्षकानुसार आशिया खंडाची ओळख राजकीय व्यवस्था, लोकशाहीचा अर्थ व व्याख्या संकल्पना स्पष्ट केली आहे. आशियाई देशांमधील लोकशाहीचा उगम ही मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर त्यांच्या आव्हानांचा विचार करत असताना तुलनात्मक इतर खंडांचा देखील विचार मांडला आहे. सध्य चालू स्थितीतील आव्हानांचा सखोल अभ्यास करून शोधनिबंध पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तावना

विशिष्ट भूप्रदेशावर कमी-अधिक संख्येत कायम राहणारा, कोणत्याही परकीय सत्तेच्या नियंत्रणापासून संपूर्णपणे किंवा बहुतांश मुक्त असणारा, रहात असलेल्या भूप्रदेशातील शासनाच्या अशा स्वाभाविकपणे पाळणारा मानव समूह म्हणजे 'राज्य' होय. वैध सत्तेचे वर्णन करण्यासाठी तसेच राजकीय तत्वज्ञानातील आदर्श समाजरचनेला अनुलक्षुन राज्य हा शब्द वापरला जातो. आधुनिक शास्त्रीय परिभाषेत राज्याला विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. सर्व प्रकारचे जीवन सुरक्षितपणे सिद्ध होईल. अशी एकत्रित येऊन कार्य करणाऱ्या मानवांची संघटना म्हणजे राज्य होय. त्यामुळे राज्य समाजाच्या घटकांच्या परस्परसंबंधांचे सामाजिक दृष्ट्या नियमन करणारी व्यवस्था व यंत्रणा ठरते. ती एक 'राजकीय व्यवस्था' बनते.

**आशियाईची ओळख**

आशियाई खंड हे क्षेत्रफळाच्या लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील पहिल्या क्रमांकाचे खंड आहे. त्याने पृथ्वीच्या एक नकरांश तसेच एकूण भूभागाच्या एक तृतियांश इतके क्षेत्र व्यापले आहे. त्याचे एकूण क्षेत्रफळ हे बेटासह 4,46,00,850 चौकीमी आहे व लोकसंख्या ही एकूण पृथ्वीच्या लोकसंख्येच्या जवळजवळ दोन-तृतियांश इतकी आहे. लोकांनी सूर्य उगवणाऱ्या बाजूचा खंड म्हणून त्यास 'आसू' हे नाव दिले आहे. आशिया खंडामध्ये जगातील सर्वांत उंच शिखर (एव्हरेस्ट), सर्वात खोल भूभाग (मृतसमुद्र), सर्वात जास्त तापमानाचे

स्थान (जेकबाबाद), सर्वात कमी तापमानाचे स्थान (व्हर्कोयान्स्क), सर्वात जास्त पावसाचे समजले जाणारे ठिकाण (चेरापुंजी), सर्वात कमी पर्जन्यमानाचा वाळवंटी प्रदेश, जास्तीत जास्त दाट लोकवस्तीचा भाग (इंडोनेशिया, चीन, भारत), अगदी विरळ लोकवस्तीचा भाग (वाळवंटे, सायबिरिया) आढळून येतात. विविध लोक, वनस्पती, प्राणी व खनिजसंपत्ती यांनी समृद्ध असणारे खंड म्हणून आशिया ओळखले जाते. तसेच जगातील मानवी उत्ःपत्ती व अनेक धर्माचे मूलस्थान म्हणून आशिया खंडास महत्त्व आहे. सिंधु संस्कृती, बॅबिलोनियन संस्कृती, सुमेरियन संस्कृती इ. प्राचीन संस्कृतीचा उगम या खंडातच झाला आहे.

भौगोलिक दृष्ट्या आशिया खंडाचे सहा विभाग पडतात.

1. पूर्व आशिया
2. मध्य आशिया
3. दक्षिण आशिया
4. अग्नय आशिया
5. मध्य पूर्व आशिया
6. उत्तर आशिया (रशिया)

आशियाईस युरोप किंवा अमेरिकासारखे स्वतःचे सांस्कृतिक वा राजकीय व्यक्तिमत्व लाभलेले नाही. यातील काही भाग आधुनिक तर काही रुढीप्रिय, काही अतिश्रीमंत तर काही दारिद्र्यात खितपत पडलेले आहेत. काही देशांनी लोकशाही तर काही देधांनी एकाधिकार पद्धती स्विकारलेली आहे. साम्यवादी व भांडवलशाही या विचारप्रणालीच्या संघर्षाने आशिया आडव्या व उभ्या विभाजनात अडकून पडलेली आहे. वसाहतवादाचा कटू अनुभव व त्यातून निर्माण झालेल्या पाश्चात्याविरोधी आशियाईस युरोप किंवा अमेरिकासारखे स्वतःचे सांस्कृतिक वा राजकीय व्यक्तिमत्व लाभलेले नाही. यातील काही भाग आधुनिक तर काही रुढीप्रिय, काही अतिश्रीमंत तर काही दारिद्र्यात खितपत पडलेले आहेत. काही देशांनी लोकशाही तर काही देधांनी एकाधिकार पद्धती स्विकारलेली आहे. साम्यवादी व भांडवलशाही या विचारप्रणालीच्या संघर्षाने आशिया आडव्या व उभ्या विभाजनात अडकून पडलेली आहे. वसाहतवादाचा कटू अनुभव व त्यातून निर्माण झालेल्या पाश्चात्याविरोधी राष्ट्रवाद हाच आशियाई देशाच्या राजकारणातील सामान्य घटक अस्तित्वात असलेला दिसतो. आशियाई देशातील राष्ट्रवाद हाच त्यांच्या ऐक्याच्या प्रगतीच्या मार्गातील अडथळा आहे. अमेरिका, युरोप खंडाप्रमाणे आशियाई राष्ट्रे कायम, स्थायी स्वरूपाची आंतरराष्ट्रीय राजकीय संस्था निर्माण करू शकले नाहीत.

जागतिक स्तरावर लोकशाहीचा विचार करता लोकशाही ही एक जीवनपद्धती आहे. ती एक राज्यघटनेचा व राज्य व्यवस्थेचा प्रकार आहे. सामाजिक जीवनाच्या आवश्यकतेतून अपरिहार्यतेतून जीवन व्यतीत करण्याच्या ज्या काही विचारप्रणाली आहेत त्यापैकी लोकशाही ही एक आहे. प्रौढ मताधिकाराच्या आधारे, खुल्या व निःपक्षपाती निवडणुकाद्वारे लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींद्वारे चालवणारे राज्य म्हणजेे लोकशाही होय. तर अब्राहम लिंकन यांच्या मते, लोकांचेच, लोकांनी केलेले लोकासाठी राज्य होय. आजपर्यंतच्या उपलब्ध शासन प्रकारांपैकी एक आदर्श शासनाचा प्रकार म्हणून लोकशाही शासन प्रकाराला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. लोकशाही हा शासनाचा प्रकार बुलटने नव्हे तर बॅलेटने अस्तित्वात येणारा शासनाचा प्रकार होय यात कोणाचेही किंचितही रक्त न सांडता शांततेच्या मार्गाने सत्ता परिवर्तन करणे शक्य आहे. इतर शासन प्रकारात सत्तांतर करण्यासाठी प्रचंड प्रमाणावर रक्तपात, हिंसा होते. पण लोकशाही शासन प्रकारात मात्र तसे घडत नाही. लोकशाही शासनप्रणालीच्या काही विचारवंतांनी केलेल्या व्याख्या पुढील प्रमाणे-

1. लोकशाही हा एक असा शासनाचा प्रकार आहे की, ज्यामध्ये राज्याची सत्ता एका किंवा अधिक वर्गाच्या हाती नसून ती सत्ता संपूर्ण लोकसमुदायाकडे दिलेली असते. - लॉर्ड ब्राईस.

2. लोकांच्या राजकीय, सामाजिक, जीवनात रक्ताचा एकही थेंब न सांडता क्रांतिकारी बदल घडवून आणणे म्हणजे लोकशाही होय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर

युरोपमधील इंग्लंड या देशाला लोकशाहीची जननी मानले जाते. कारण विद्यमान इंग्लंडमधील लोकशाही ही प्रदीर्घ परंपरेतून विकसित झालेली आहे. इंग्लंडमधील लोकशाहीच्या विकासाच्या प्रक्रियेबरोबरच अन्यत्रही लोकशाहीचा प्रसार झाला. इंग्लंडच्या अधिकापत्याखालील अमेरिकी वसाहतीनी सशस्त्र लढा देऊन स्वातंत्र्य मिळविल्यानंतर मर्यादित शासन व निसर्ग सिद्ध हक्काची कल्पना आधारभूत मानणारे लिखित

संविधान संमत करून मानवी हक्क, समानता इ. लोकशाही तत्वाचा पुरस्कार केला. अमेरिकेच्या यशामुळे इंग्लंडला आपल्या वसाहतविषयक धोरणात अमूलाग्र बदल करावा लागून ब्रिटीश राष्ट्रकुलाचा जन्म झाला आणि जागतिक राजकारणात लोकशाही विचारप्रवाह वाढू लागले. कालांतराने विसाव्या शतकात आफ्रिका, आशिया, खंडातील वसाहतीक देश स्वतंत्र होऊ लागले. वसाहतवादाविरोधी चळवळीतून तेथील लोकशाही प्रेरणांचा अविष्कार झाला. वसाहतिक पारपंत्र्यातून मुक्त झालेल्या बहुतेक सर्व नवोदित देशांनी तत्त्वतः लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला असला आणि संविधानात लोकशाही व प्रजासत्ताक या शब्दाचा निर्देश केला तरी प्रत्यक्षात तिथे लोकशाहीला परिपक्व वातावरण नसल्यामुळे बहुसंख्य देशात लष्करी राजवटी किंवा सर्वंकष शासनसपद्धती वा साम्यवादी राज्यवटी अस्तित्वात आल्या. त्या नव स्वतंत्र देशामध्ये लोकशाही पद्धती टिकली. तिथेही विषयमता, विविधता, राष्ट्रीय ऐक्याचे प्रयत्न, आर्थिक विवंचना, अस्थैर्य, इ. कारणांमुळे लोकशाहीच्या विकासांवर अनेक मर्यादा पडलेल्या दिसतात.

सध्य स्थितीत भूराजकीय व्यवस्थेमध्ये लोकांच्या गरजा, कौशल्य मागण्या यांचा पाठपुरावा करणारी यंत्रणा म्हणून अनेक शासकीय संरचनेमध्ये चढाओढ असलेली पहायला मिळते. अमेरिका आणि इतर पाश्चात्य राष्ट्रांतील नेत्यांनी जागतिक हुकुमशाहीच्या पुनरुत्थानासह नागरिक लोकशाही भेदीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. आशियाई राजकीय व्यवस्थेतील लोकशाहीला कोण-कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे याचा आढावा पुढीलप्रमाणे-

1. रशिया-युक्रेन युद्धजन्य परिस्थितीची टांगती तलवार.

सध्य स्थितीत फेब्रुवारी 2022 मध्ये सुरू झालेल्या रशिया-युके्रन युद्धाची झळ ही अनेक आशियाई राष्ट्रांना बसणार आहे. अमेरिकेसह पाश्चिमात्य देशांनी रशियावर अनेक प्रकारचे निर्बंध लादण्यास सुरुवात केल्यामुळे भारत-रशिया यासारख्या द्विराष्ट्र संबंधांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. रशियावर अनेक निर्बंध लादल्यामुळे त्याचा जागतिक तसेच आशियाई लोकशाही राष्ट्रांना फटका बसेल. जागतिक अर्थव्यवस्था कोलमडण्यास सुरुवात झाली आहे. रशिया -युक्रेन युद्धजन्य परिस्थितीची टांगती तलवार आशियाई लोकशाही समोर आव्हान म्हणून उभी राहिली आहे.

2. कोरोना महामारीचे सावट

कोरोना महामारीचे सावट हे आशियांप्रमाणेच जगावर आलेले संकट होते. आणि ते अजुनसुद्धा आहे. या काळामध्ये कोरोनाच्या आडून काही राजकीय व्यवस्था ही हुकुमशहा गाजवत असल्याचे भासत होते. तर काहींना हे लोकशाहींचेच अपयश आहे, असे वाटत होते. अनेक आशियाई राष्ट्रांनी संकटकाळात राजकारण न करता सरकारच्या प्रयतनांना बळ देण्याचा प्रयत्न केला आहे. कोरोना संकटाशी लढा देताना सरकारला आलेल्या यशाचे मूल्यमापन करण्यासाठी विविध पद्धती उपलब्ध असल्या तरी सर्वोत्तम पद्धती म्हणजे प्रति दशलक्ष लोकसंख्यमागे कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या लोकांची संख्या किती आहे, याचे मोजमाप करणे होय. यातून दोन अन्वयार्थ निघतात. एक म्हणजे त्या देशाला बाधितांच्या संख्या मर्यादित ठेवण्यात यश आले आणि बाधितांना मिळालेल्या उपचारांची गुणपत्ता कशी होती याची तपशीलवार माहिती मिळणे उपयुक्त असते पण हुकुमशाहीवादी देशांची सरकारे कोरोना विषाणुसंदर्भातील घटना आणि त्याच्याशी संबंधित मृत्यूंची आकडेवारी दाबून ठेवण्याचा प्रयत्न करत असत. त्यामुळे हुकुमशाहीवादी देशांपेक्षा लोकशाहीवादी देशांमधील कोरोना विषाणु बाधितांच्या संख्याभोवतीचा सरासरीची आकडेवारी सतत बदलताना दिसत होती. लोकशाहीवादी विकसनशील देशाच्या रांगेत भारत खालच्या क्रमांकावर आढळतो तर व्हिएतनाम मध्ये ती संख्या अगदी नगण्य असताना दिसते. बंदिस्त राजकीय व्यवस्था असलेला चीन त्यांच्या आकडेवारीबाबद साशंक असताना दिसतो. रशिया मात्र कोरोना संकटापासून स्वतःला बचाव करण्यात फारसा यशस्वी ठरलेला दिसत नाही. राजकीय व्यवस्थेचे महत्त्व आधोरेखित करत असताना लोकशाहीवादी देशांमधील उत्पादकतेचे प्रश्न ही तितकेच महत्त्वाचे आहेत.

3. असमानता आणि उच्चभ्रू भ्रष्टाचार

आशियाई राष्ट्राच्या संपत्तीत वाढ होत असल्याने विषमता - असमानता ही गोष्ट गंभीर होत चालली आहे. आशियाई विकास बँकेच्या संशोधनानुसार प्रादेशिक असमानता ही गेल्या दोन दशकापासून

42टक्क्यांनी वाढली आहे. जी आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांसारख्या इतर विकसनशील राष्ट्रांपेक्षाही अधिक आहे. त्याचप्रमाणे उच्चभ्रूर भ्रष्टाचार अनेक देशांमध्ये गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. ज्यामुळे सरकारी उलाढालीमध्ये फार मोठा बदल होतो आहे. मलेशिया, दक्षिण कोरिया यांसारख्या देशांतील राजकीय नेतृत्वास अटक होण्यास कारणीभूत ठरते. सोफिया लेमेरे यांच्या नुसार मलेशियाच्या माजी पंतप्रधान नजीब रझाक यांना अटक होऊनदेखील त्यांची लोकप्रियता व राजकीय प्रतिमा यामुहे त्यांनी परत जनतेच्या मनात जागा निर्माण केली. परंतु त्यामुळे देशाच्या व्यवस्थेला फार मोठा तडा गेला आहे. आणि तो भरून काढणे कठीण आहे. तसेच जंग एच पाक यांनी ही त्यांच्या पेपरमध्ये दक्षिण कोरीयाबाबत असेच प्रतित केले आहे की ढेळल रपव लेपसश्रेशीरींशी (राज्य आणि समूह यांच्यातील कटू भागिदारी) यामुळे प्रशासनिक सुधारणावादी लोकांची इच्छा सार्वजनिक मागण्यांच्या पूर्ततेसाठी मर्यादित होऊन जाते.

एकंदरित अशा या प्रवृत्तीमुळे शासकीय उच्च पदस्थांवरील अविश्वास वाढीस लागला आहे. त्यामुळे लोकशाही संस्थांची कथित वैधता कमी झाली आहे. ज्याप्रमाणे फिलिपाईन्सचे अध्यक्ष रॉड्रिगो दुर्तेते, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इंडोनेशियाचे अध्यक्ष जोकोवी विडोडो ज्यांनी सत्तेसाठी देशांतर्गत लोकशाहीस पूरक असणाऱ्या संस्थेस आणखी कमकुवत केले आहे.

4. देशांतर्गत धुरवीकरण आणि वांशिकतावादाचा उदय

अनेक आशियाई लोकशाही राष्ट्रांमध्ये धार्मिक, वांशिक आणि राजकीय संरचनेसारख्या वाढत्या राजकीय धुरवीकरणाचा क्षोभ वाढला आहे. रिचर्ड. सी. बुश यांच्या निरिक्षणांनुसार तैवानमध्ये लोकशाही उपलब्ध असूनही त्या ठिकाणी राजकीय व्यवस्थेचे बहुसंख्य स्वरूप हे राजकीय ध्रुवीकरणाचे संरचनात्मक प्रवृत्ती निर्माण करते. अशा मुळे सरकारच्या विकासात्मक परिणामकतेवर बाधा निर्माण होताना दिसते. महत्त्वाच्या धोरणात्मक मुद्द्यांवर अनियमितता येते आणि त्यामुळेच सरकारची क्षमता मर्यादित होते.

वांशिकतेबरोबरच धार्मिक क्षेत्रातही अशाच समस्या दिसून येतात. इंडो-पॅसिफिककडे तर सामान्यतः धार्मिक संहिष्णुतेला अनुमती देणारा प्रदेश म्हणूनच पाहिले जाते. तथापि, 2019 च्या Few research center report नुसार गेल्या दशकभरात आशियामध्ये धार्मिक हिंसाचार आणि धर्म आधारित निर्बंधामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. देशांतर्गत या गोष्टी नवीन नसल्या तरी मोदी, जोकोवी, आंगसानस्यूकी यासारख्या राष्ट्रीय नेत्यांनी राजकीय फायद्यासाठी वांशिक-राष्ट्रवादाचा गैरफायदा घेण्याचा केलेला आवेग एक उल्लेखनीय व त्रासदायक विकास असताना दिसतो.

5. नागरी समाजाची मूल्यहिनता

इंडो-पॅसिफिक प्रदेशामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये चिंताजनक प्रवृत्ती दिसून येत आहे. नवीन कायदे निर्माण करून व्यक्ती आणि नागरी स्वातंत्र्यावर संमेलन स्वातंत्र्य, नागरी समाज संस्था, धार्मिक संस्था आणि वृत्तपत्र स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्यात येत आहेत. त्या ठिकाणच्या अहवालानुसार सामाजिक माध्यमांचे वतावरण स्वतंत्र सामाजिक संस्थावर बंदी, वाढीव सेन्सॉरशिपचे कायदे आणि पत्रकारांवरील पोलीस हिंसाचार यांकडे निर्देश करते. नवीन एन.जी.ओ. नोंदणी संस्था कायद्यांकडे लक्ष वेधून नऊ आशियाई लोकशाही राष्ट्रांमध्ये नागरी समाजाच्या टिकावूपणाचे विश्लेषण केले आहे. नागरी समाजाची मूल्यहिनता कशी होते आहे हे दाखवून दिले आहे.

6. राजकारणातून स्त्रियांना वगळण्याची प्रवृत्ती

स्त्री शक्ती ही एक समाजपरिवर्तन घडवू पाहणारी, राजकीय जाणीव आहे. या स्त्रीशस्ती जाणिवेचा विविध दृष्टिकोनांतून भिन्न, भिन्न पातळ्यांवरचा अविष्कार स्त्री शक्तीमध्ये आढळून येतो. उदारमतवादी, मार्क्सवादी, समाजवादी, उत्तर आधुनिकता अशा अनेक विचारप्रणालींमध्ये स्वतःची भर घालून स्त्रीवादी-जागरूकता स्त्री-पुरुष विषयमतेचा पश्नांची मीमांसा करते.

स्त्रियांचा राजकारणातील सक्रिय भाग हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. स्त्रियांचा राजकारणातील सहभाग हा खूप व्यापक विषय असून त्याचा केवळ मतदानाशी संबंध जोडणे इतकाच मर्यादित ठेवला आहे. अमेरिका, युरोप खंडातील राष्ट्रांप्रमाणे स्त्रियांना राजकीय अधिकार स्वातंत्र्य, आशिया खंडातील राष्ट्रांमध्ये दिसून येत नाही. आशियामध्ये स्त्रियांना अजून देखील दुय्यमत्व बहाल करण्यात येते.

भारतासारख्या स्थानिक स्वराज संस्थामध्ये 50 टक्के आरक्षण दिल्याने महिलांचा सहभाग वाएला आहे. पण त्यांची राजकीय सत्तेत व निर्बंध निर्धारण प्रक्रियेतील स्थान नगण्यच दिसून येते. एकंदरित आशिया राष्ट्रांत महिलांना राजकीय वर्तुळातून वगळण्याचीच प्रवृत्ती दिसून येते.

7. फॅसिझम

आपल्या देशात लोकशाही चालू असावी आणि चालू रहावी यावर त्यांचा विश्वास आहे. त्या सर्वांचा हुकुमशाहीला विरोध हा असतोच. पण फॅसिझम ही अशी एक शक्ती आहे जी दहशतवाद निर्माण करते. फॅसिझम शक्ती कधी निर्माण होऊ न देण्याचे आव्हान स्विकारायला हवे.

युरोपातील लोकशाहीवादी राष्ट्रे इंग्लंड आणि फ्रान्स आक्रमक नाहीत. लोकशाही वर्षानुवर्षे युरोपच्या इतर राष्ट्रात जीवन जगत आली आहे. पण तो छोटी राष्ट्रे, इंग्लंड आणि फ्रान्स यांच्या भोवती जे तेजोवलय आहे त्याच्या झगमगाट काही निराळाच आहे. संंबंध आशिया आणि आफ्रिका गुलाम करून लुटुन यांनी परत केला. जगातल्या सर्व हुकुमशाह केवळ कम्युनिझमचा भितीपोटी सावरून धरण्याचा प्रयत्न करणारी मंडळभ बाह्यकाराने लोकशाहीवादी असतील पण ते अंतरंगी फॅसिस्टीय आहे. धर्म संस्कृतीत फॅसिझमचे बीजे हजारो वर्षांपासून आशियाई देशांत अस्पृश्य, आदिवासी आहेत. स्त्रीबद्दलचा तुच्छवाद आहे याचा अर्थ फॅसिझमची भूमिका इथे धर्म संस्कृती तयार करून ठेवली आहे. म्हणून लोकशाही आणि वर्णव्यवस्था, मनृस्मृती या परस्परविरोधी सत्ता आणि विचार व आचार पद्धती अस्तित्वात आहेत. लोकशाहीला वर्ण वादाविरुद्ध असलेली बुद्धी प्रमाणवादी परंपरा देण्याचा विचार व्हायला हवा.

8. दहशतवादाची वाढती जागतिक  दहशत

साधारणतः 1990 ते 2000 पर्यंत दहशतवादी घटना हा आशिया आणि आफ्रिका खंडापर्यंतच मर्यादित होत्या. 2000 नंतर अमेरिका आणि युरोप हे दहशतवाद्यांचे टार्गेट बनण्यास सुरुवात झाली. 2009 मध्ये अमेरिकेमध्ये दहशतवादी हल्ला झाला आणि अशा प्रकारचे हल्ले घडण्यास सुरुवात झाली. अमेरिका आणि युरोपीयन राष्ट्रे तेल आणि तेलाच्या राजकारणासाठी पश्चिम आशियातील इस्लामिक राष्ट्रांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप करत आहेत. पुढे हा हस्तक्षेप सांस्कृतिक स्वरूपाचा बनत असून याच्या विरोधातून दहशतवादी संघटनाचा जन्म होत आहे. त्यामध्ये  अल कायदा ,  तालिबान , अरब स्प्रिंग, इस्लामिक स्टेट यांचा समावेश होतो. सोशल मीडियाच्या माध्यमातून या संघटना आपल्या विचारसरणीचा प्रसार करत आहेत आणि त्याआधारे भावनिक व धार्मिक आवाहन करून लोकांची माथी भडकवण्याचे प्रयत्न करत आहेत. त्यामुळे आज अनेक देशांमध्ये या दहशतवादी संघटनांचे अनुयायी किंवा समर्थक किंवा त्यांची विचारसरणी अनुसरणारे लोक तयार होत आहेत. हेच लोक आता दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होत आहेत. दक्षिण आशियामध्ये अलकायदा व इस्लामिक स्ट्रेटमध्ये शक्तीप्रदर्शन घडवण्यात संघर्ष होत आहे. या शक्तिप्रदर्शनामुळे हिंसाचाराचे प्रमाण वाढत आहे. यामुळे आशियाई राजकीय प्रकियेत लोकशाही पुढील मोठे आव्हान म्हणून दहशतवाद समोर येत आहे.

9. काळा पैसा साठवण्याचे केंद्रस्थान

भ्रष्टाचार, करचुकवेगिरी, गुन्हेगारी यांसारख्या सर्व बेकायदेशीर व्यवहाराची बिले प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये कायमच नांदत असतात. त्यांना देशातील सत्ताधाऱ्यांची छुपी मान्यता असली तरी ते त्यांचे खुले समर्थन करू शकत नाही. त्यामुळे यातून निर्माण झालेला पैसा हा गुप्तपणे सीमा पार करून देशाचे कायदे न चालणाऱ्या ठिकाणीच ठेवावा लपवावा लागतो. जगात अशा प्रकारे  निर्माण झालेला किमान दीड हजार अब्ज डॉलसृचा काळा पैसा दरवर्षी देशांच्या सीमा पार करून कर तपासणी प्रश्न उत्तरदायित्वमुक्त अशा केंद्रामध्ये लपवला जातो. स्विस बँका हे त्याचे सर्वात ज्ञात असे उदाहरण आहेच पण या काळ्या धंद्यामध्ये आता अंमली पदार्थ आणि दहशतवादातील पैशाची भर पडली आहे. आकाराने प्रचंड असणाऱ्या समाजवादी सोवियत युनियनचे 1993 मध्ये पतन झाल्यावर रशियात आर्थिक माफियाचे राज्य निर्माण झाले आहे. शिवाय, 1994 नंतर ज्या प्रकारची वित्तीय आर्थिक बेबंदशाही सुरू झालेली आहे. त्यामुळे अशा सर्व काळ्या व्यवहारातून निर्मित बेकायदेशीर पैशाला आश्रय देणारी स्विस बँकाप्रमाणेच नवीन केंद्रे आशिया व इतर ठिकाणी निर्माण झालेली आहेत.

काळा पैसा ही आशिया राजकीय क्षेत्रातील फार मोठे आव्हान आहे.कारण भ्रष्टाचारातून फक्त काळा पैसा निर्माण होत नाही, तर त्यातून देशाचे सर्व जनताभिमूख कायदे, योजना, संस्था, करसंकलन यांचे पूर्ण विकृतीकरण होते. लोकशाही हायजेक केली जाते कारण त्यांची किंमत म्हणूनच तो पेसा दिला जात असतो. करचुकवेगिरीतून सरकारची क्षमताच संपते. समाजाची सामूहित कृती करण्याची शक्तीच मारली जाते. गुन्हेगारीतून असुरक्षितता निर्माण होते म्हणून प्रश्न फक्त प्रशासकीय किंवा तांत्रिक राहता तो सामाजिक होतो. यापैकी एक तृतियांश पैसा जरी लोक कल्याणासाठी खर्च झाला तरी मोफत आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था उत्तम पायाभूत सुविधा, स्वस्त वीज यांची उभारणी शक्य होऊन जाते.

समारोप

आशिया खंडातील राजकीय व्यवस्थेमध्ये लोकशाहीला बाधा ठरणाऱ्या आव्हानांचा उहापोह घेतला असता असे लक्षात येते की आज नागरिक साखळीत बदल झाल्यामुळे एक जागतिक कुटुंब म्हणून ज्या आव्हानांना आपण सामोरे जात आहोत ती आव्हाने देखील कमी होत असताना दिसत नाहीत. या आव्हानांचा सामना करण्यासाठी प्रत्येक जागतिक यंत्रनेने सामुहिक आणि एकाच गतीने कार्य करणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांना एकसमान विचार करणे आवश्यक आहे. मात्र आज जागतिक परिस्थिती बघता असा ही पश्न निर्माण होतो की या बहुराष्ट्रीय संस्था-संघटना बदलेली जागतिक परिस्थिती आणि इतर अनेक आव्हानांचा सामना करण्यास तयार आहे का ? तेवढे सामर्थ्य त्यांच्यात आहे का? प्रत्येक लोकशाही देशाची जबाबदारी आहे की या समज्यावर सुधारणावादी दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे. नव्या आव्हानांचा सामना करण्यासाठी आशियासोबत आज जगाला नवे मार्ग शोधण्याची गरज आहे. नवे संकल्प करण्याची गरज आहे. आज आशियाबरोबर जगातील प्रत्येक राष्ट्रांसोबत सहकार्य वाढण्याची पूर्वीपेक्षा अधिक गरज निर्माण झाली आहे. तरच लोकशाही मार्गाने विकास साधने शक्य होईल. आशियाई राष्ट्रांसमोरील राजकीय प्रक्रियेतील लोकशाही समोरील आव्हाने कमी होण्यास मदत होईल.

संदर्भ ग्रंथ

1. Lindsey to ford and ryan hass democracy in asia - Africa - Article friday 22 Jan 2021
2. Dahl robert a demoerary and its cricel new delhi 1991
3. महाराष्ट्र टाईम्स, दैनिक लेख, शैलेंद्र देवळणकर 3 एप्रिल 2016
4. बांबले रोहिदास, भारतीय लोकशाही समोरील आव्हाने लेख 10 एप्रिल 2017
   http://maharashtratimes.indiatimes.com.
5. आठवले सदाशिव, लोकशाहीचा कारभार, पुणे 1960
6. सहस्रबुद्धे, पु. ग. भारतीय लोकसत्ता, पुणे